# अहवाल – अर्थशास्त्र विभाग

**दि. १३/१/२०२४**

**व्याख्यानमाला– शेअर बाजार व्यवसाय की जुगार**

**व्याख्याता – मा. श्री. विष्णुकांत फाफट** (संचालक– बोस्टन इन्स्टीट्यूट, धुळे)

वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित कला, वाणिज्य व बी.सी.ए. महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे येथे अर्थशास्त्र विभाग व मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३/१/२०२४ शनिवार रोजी सकाळी १०.०० वाजता व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. व्याख्यानमालेस प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अविनाश निकम (कार्याध्यक्ष म.अ.प.) व प्रमुख वक्ते श्री. विष्णूकांत फाफट (संचालक– बोस्टन इन्स्टीट्यूट, धुळे), प्रा. जे. डी. तलवारे, प्रा. मोहन पावरा यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करुन व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाऊन सर्व उपस्थितांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.झेड. चौधरी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्विकारले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. के. शिंदे यांनी प्रास्तविक केले. प्रास्तविकात त्यांनी मराठी अर्थशास्त्र विषयाच्या विकासातील म.अ.प. चे योगदान याबद्दल सविस्तर माहिती दिली.

अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एस. पी. पाटील यांनी प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते यांचा मोजक्या व सुंदर शैलीत परिचय करुन दिला. परिचयानंतर ज्ञानरुपी ग्रंथ व गुलाबपुष्प देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर लगेचच प्रमुख वक्ते यांच्या व्याख्यानास प्रारंभ करण्यात आला.

प्रमुख वक्ते मा. विष्णुकांत फाफट यांनी शेअर बाजार व्यवसाय की जुगार या विषयावर अतिशय सोप्या, सरळ भाषेत चर्चा करुन शेअर बाजार विषयक भिती दूर केली. लोकांचा असा समज आहे की, शेअर बाजार म्हणजे लाखाचे बारा हजार होण्याचे ठिकाण होय परंतू मा. फाफट यांनी हा गैरसमज अतिशय सोप्या भाषेत स्पष्ट करुन सांगितला त्यांच्या मते क्या चल रहा है और क्या चलनेवाला है – या उक्तीप्रमाणे बाजारात ज्या वस्तूंची मागणी वाढणार आहे त्याची किंमत देखील वाढून शेअरची किंमत देखील वाढते जसे की टाटा केमिकल , टाटा मीठ, कोलगेट, पेडीलाईट या वस्तूंची बाजार मागणी वाढती असल्यामुळे त्यांचे शेअर ही वाढतील. याप्रमाणे शेअर बाजाराकडे व्यवसाय म्हणून पहावे व संधी शोधावी. पुढे विष्णुकांत फाफट असे म्हणाले की, शेअर बाजार जुगार आहे असे म्हणणा–यांनी एक तर कधीच पैसे गुंतविलेले नसतात अथवा कुणाच्या तरी सांगण्यावरुन बाजार मागणीचा विचार न करता स्वस्त शेअर मध्ये पैसे गुंतविलेले असतात. ते पुढे म्हणाले की बेसिक तत्वांचा वापर करुन जर शेअर बाजारात गुंतवणूक केली तर मात्र नक्कीच आपण यातून चांगला परतावा मिळवून यशस्वी होऊ शकतो. आय.सी.टी.च्या माध्यमातून विविध स्लाईडस दाखवून मा. फाफट यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. डॉ. अविनाश निकम यांनी मनोगत व्यक्त केले. मनोगतात ते म्हणाले की, व्याख्यानमालेचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवूनच आजची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. नवनिर्वाचीत प्राध्यापकांनी व अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सभासद व्हावे असे आवाहन डॉ. निकम यांनी केले. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल बोलतांना डॉ. निकम म्हणाले की, अतिशय उत्कृष्ठ अशा व्याख्यानमालेचे आज आयोजन करण्यात आले. त्याबद्दल डॉ. निकम यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व अर्थशास्त्र विभागाचे कौतुकास्पद शब्दात आभार व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. झेड. चौधरी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. मनोगतात प्राचार्यांनी आशा व्यक्त केली की मराठी अर्थशास्त्र परिषदेचे असे अजून काही कार्यक्रम आमच्या महाविद्यालयात व्हावेत. व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न करण्याबद्दल म.अ.प. व अर्थशास्त्र विभागाचे आभार व्यक्त केले.

अर्थशास्त्र विभागातील प्रा. सोनाली वानखेडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. नगाव महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. आर. पी. पाटील यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. विविध महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होते. सर्वांना उपस्थितीबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी धुळे शहर व परीसरातील जवळ जवळ ५० प्राध्यापक व ५५ संशोधक विद्यार्थीनी उपस्थित होत्या.